उप आयुक्त कार्यालय
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- घव्यका/२५३२
दिनांक :- २५/०८/२०२२

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय :- गणेशोत्सव २०२२ च्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांतर्गत करावयाच्या कामकाजाबाबत व पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी क्षेत्रिय कार्यालयांतर्गत पुनरावर्तन उप्रकम राबविणेबाबत.**

सालाबादप्रमाणे दिनांक ३१/०८/२०२२ ते दिनांक ०९/०९/२०२२ या कालावधीत पुणे शहरात सर्वत्र सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. या गणेशोत्सव कालावधीत पुणे शहरात सर्वत्र सार्वजनिक स्वच्छता राखली जाणे अत्यावश्यक आहे. त्या अनुषंगाने सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी आपले कार्यक्षेत्रातील सर्व सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, ओपन प्लॉट, क्रॉनिक स्पॉट, नदीपात्र, नदीघाट, विसर्जन हौदांची ठिकाणे, सार्वजनिक गणेश मंडळांचे परिसर या सर्व ठिकाणी स्वच्छता राखली जाईल याची दक्षता घेऊन खालीलप्रमाणे आवश्यक नियोजन करावयाचे आहे.

- मे.केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने प्लॅस्टर ऑफ पॅरीसपासून बनविलेल्या गणेश मूर्तींना प्रतिबंधित करण्यात आलेले असून त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेमार्फत नागरिकांना प्लॅस्टर ऑफ पॅरीसपासून बनविलेल्या गणेश मूर्तीं ऐवजी शाडू माती व पर्यावरणपूरक पद्धतीने बनविलेल्या मूर्ती वापराबाबत जनजागृती करावयाची आहे.
- तसेच गणेश मूर्त्यांचे विसर्जन कोणत्याही नैसर्गिक जलस्त्रोतात केले जाणार नाही याकरीता योग्य ती कार्यवाही करावयाची आहे. यामध्ये नागरिकांमध्ये जनजागृती, जास्तीत जास्त मूर्ती दानास प्रोत्साहन, अधिक प्रमाणात मूर्ती संकलन/दान केंद्राची उभारणी करणे, पुरेशा प्रमाणात कृत्रिम विसर्जन टाक्यांची उपलब्धता करणे, आवश्यकेनुसार फिरत्या हौदांचे नियोजन करणे, निर्माल्य व्यवस्थापन व वर्गीकरण इ. सर्व कामकाज क्षेत्रिय कार्यालय स्तरावर करावयाचे आहे.
- मूर्ती संकलन/दान केंद्रे व फिरत्या हौदांचे मार्ग याविषयी सामान्य नागरिकांना माहिती मिळावी या दृष्टीने जास्तीत जास्त प्रचार व प्रसार करण्यात यावा.
- गणेशोत्सव २०२२ मध्ये पुणे महानगरपालिका व विविध स्वयंसेवी संस्थांमार्फत पुनरावर्तन उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये ECOEXIST संस्था, स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था व इतर विविध स्वयं सेवी संस्थांमार्फत गणेश विसर्जनानंतरची शाडूची माती संकलित करून त्याचा पुर्नवापर केला जाणार आहे. त्यामुळे क्षेत्रिय कार्यालयामार्फत उभारण्यात येणा-या सर्व गणेश विसर्जन ठिकाणी तसेच मूर्ती संकलन/दान केंद्राच्या ठिकाणी नागरिकांना विसर्जित केलेल्या मूर्तींची शाडू माती संकलित करण्याची सोय उपलब्ध करून द्यावयाची आहे. क्षेत्रिय कार्यालयांतर्गत

संकलन केंद्रावर संकलित करण्यात आलेली शाडू माती ECOEXIST संस्थेस द्यावयाची आहे. पुनरावर्तन उपक्रमाविषयी सविस्तर माहिती www.punaravartan.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून याचा जास्तीत जास्त प्रचार व प्रसार करावयाचा आहे.

- सर्व मूर्ती संकलन/दान केंद्राच्या ठिकाणी निर्माल्य संकलनाची व्यवस्था करून संकलित केलेले निर्माल्य वर्गीकृत स्वरूपात प्रक्रिया प्रकल्पापर्यंत पोहचविले जाईल याची दक्षता घ्यावयाची आहे.
- क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सर्व सावर्जनिक व वस्ती पातळीवरील शौचालयांची स्वच्छता करण्यासाठी तीन पाळ्यांमध्ये सेवकांची नेमणूक करावयाची आहे. सर्व सार्वजनिक व वस्ती पातळीवरील शौचालयांची स्वच्छता राखणे, शौचालयाच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करणे व परिसरात पावडर ची फवारणी करणे इ.कामकाज करावयाचे आहे.
- सर्व सार्वजनिक व वस्ती पातळीवरील शौचालयाच्या दर्शनीभागात महिला व पुरुष शौचालय असलेबाबतचे दिशादर्शक फलक लावण्यात यावेत.
- त्याचप्रमाणे कृत्रिम विसर्जन हौद, लोखंडी टाक्यांचा परिसर याठिकाणी देखील स्वच्छता राखली जाईल याची दक्षता घ्यावी. याठिकाणी आवश्यकतेनुसार पोर्टेबल शौचालयांची सोय करावयाची आहे. त्यासाठी घनकचरा व्यवस्थापन मुख्य विभागाकडे त्वरीत पोर्टेबल शौचालयांची मागणी करावी.
- गणेश मूर्त्यांची वाहतूक करणा-या सर्व गाड्या या ताडपत्रीने बंदिस्त केलेल्या असतील याची दक्षता घ्यावी.

कळावे.

(आशा राऊत)
उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

प्रत-
१) मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. १ ते ५ पुणे महानगरपालिका.
२) महापालिका सहाय्यक आयुक्त, सर्व क्षेत्रिय कार्यालये, पुणे मनपा.